AC – 20.04.2024
Item No. – 5.4 (N) Sem II (1b)

# As Per NEP 2020

# University of Mumbai

| Syllabus for<br>Basket of OE | |
|---|---|
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG First Year Programme** | |
| **Semester** | **II** |
| **Title of Paper** | **Credits** |
| **साहित्य परिचय: प्रवासवर्णन** | **2** |
| **From the Academic Year** | **2024-25** |

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **Description of the course :**<br><br>**Including but Not limited to :** | **साहित्य परिचय:  प्रवासवर्णन**<br>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार लागू होणाऱ्या नवीन शैक्षणिक संरचनेच्या  अंतर्गत अभ्यासक्रमाचे स्वरूप बहुविद्याशाखीय ( Multi-Disciplinary) आहे. त्यामुळे पदवीस्तरावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या मुख्य विषयाची( Major course) विद्याशाखा सोडून अन्य विद्याशाखेतील कोणत्याही विषयांचा अभ्यास मुक्त वैकल्पिक म्हणजे Open Elective ( OE) या स्तंभांतर्गत करणे अनिवार्य आहे. पदवीस्तरावर प्रथम व द्वितीय अशा  दोन वर्षांत  प्रत्येकी दोन श्रेयांकनाच्या अभ्यासपत्रिका निवडून या स्तंभांतर्गत १०- १२ श्रेयांकने प्राप्त करणे आवश्यक आहे.  वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी कला व मानव्यविद्या शाखेतील  मराठी हा विषय  अन्य विद्याशाखीय विषय ठरतो. हे विद्यार्थी प्रस्तुत अभ्यासपत्रिका OE स्तंभांतर्गत निवडू शकतात .<br>प्रवास म्हणजे केवळ पर्यटन नसून निसर्ग, समाज आणि संस्कृती या विविध अंगांचा डोळस परिचय असतो. ही प्रक्रिया शब्दबद्ध करताना संवेदनशील आणि विचारी व्यक्ती आपल्या प्रवासाला प्रवासवर्णनाचे रूप देते. प्रवासवर्णनात  मराठी साहित्यात ‘प्रवासवर्णन’ या साहित्यप्रकाराचे समृद्ध दालन उपलब्ध आहे. पर्यटनाच्या आर्थिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक अनुभवाशी वाचकांना जोडून घेणारे हे साहित्य त्यांच्या व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक दृष्टीमध्ये महत्त्वाचा बदल घडवू शकते. त्याबरोबरच त्यातील वर्णनपर व ओघवत्या भाषाशैलीमुळे प्रवासवर्णनाला दृकमूल्य प्राप्त होते परिणामी एका वेगळ्याच कलात्मकतेचे दर्शन लेखक घडवू शकतो. मराठी साहित्यातील अशा लेखनाच्या परंपरेचा आणि प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचा परिचय करून देणे हा अभ्यासपत्रिकेचा उद्देश आहे. |
| 2 | **Vertical :** | Open Elective |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit**: | 02 (1 credit = 15 Hours for Theory in a semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 30 Hours |

| | | |
|---|---|---|
| 6 | **Marks Allotted**: | 50 Marks |
| 7 | **Course Objectives**:<br>१. प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचे स्वरूप व परंपरा समजावून देणे.<br>२. प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचे घटक व वैशिष्ट्यांचा परिचय करून देणे.<br>३. प्रवासवर्णनातून व्यक्त होणाऱ्या अपरिचित भूप्रदेशातील निसर्ग, समाज व संस्कृती यांच्यातील परस्परसंबंध समजून घेणे.<br>४. प्रवासवर्णनातील अनुभव शब्दबद्ध करताना लेखकाने भाषाशैली कशी वापरली आहे हे समजून घेणे.<br>५. पर्यटन आणि पर्यटकाची सामाजिक दृष्टी यांच्यातील आंतरप्रक्रिया समजून घेणे.<br>६. प्रवासवर्णनातून अधोरेखित होणारी प्रवासवर्णनकाराची दृष्टी समजून घेणे. | |
| 8 | **Course Outcomes**:<br>१. प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचे स्वरूप व परंपरांचे आकलन होईल.<br>२. प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचे घटक व वैशिष्ट्यांचा परिचय होईल.<br>३. प्रवासवर्णनातून व्यक्त होणाऱ्या अपरिचित भूप्रदेशातील निसर्ग, समाज व संस्कृती यांच्यातील परस्परसंबंधांचा उलगडा होईल.<br>४. प्रवासवर्णनात लेखकाने वापरलेल्या भाषाशैलीचा रसास्वाद घेता येईल.<br>५. पर्यटनाचा सामाजिक दृष्टीवर होणारा परिणाम लक्षात येईल.<br>६. प्रवासवर्णनातून अधोरेखित होणारी प्रवासवर्णनकाराची दृष्टी समजून घेता येईल. | |

| | |
|---|---|
| 9 | **Modules**:- Per credit One module can be created |
| | **Module 1:** प्रवासवर्णन – साहित्यप्रकार परिचय |
| | १. प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचा उगम<br>२. प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराची संकल्पना व व्याख्या<br>३. प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचे महत्त्वाचे घटक – प्रवासी, प्रवास आणि प्रदेश.<br>४. प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १. |
| | **Module 2:** ईरान् पारश्यांचे तीर्थक्षेत्र (प्रवासवर्णन) : लेखक – डॉ. अविनाश बिनिवाले<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १. |
| 10 | **Text Books: NA** |

| | |
|---|---|
| 11 | **Reference Books: संदर्भसूची :**<br>१. भागवत श्री. पु. (संपा.), साहित्य : अध्यापन आणि प्रकार (वा. ल. कुळकर्णी गौरवग्रंथ), पॉप्युलर प्रकाशन आणि मौज प्रकाशन, मुंबई १९८७ |

| | | |
|---|---|---|
| | २. सावंत वसंत, प्रवासवर्णन एक वाङ्मयप्रकार, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती १९८७<br>३. जाधव रा. ग. (मुख्य संपा.), मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा : भाग तिसरा १९५० ते २०००, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पहिली आवृत्ती २०१०<br>४. बिनीवाले अविनाश, ईरान् पारश्यांचे तीर्थक्षेत्र, सिंधु प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०२३ | |
| **12** | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination 60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination** |
| **13** | **Continuous Evaluation through:**<br>Quizzes, Class Tests, presentation, project, role play, creative writing, assignment etc.( at least 3 ) | चाचणी परीक्षा /लेखी/ ऑनलाईन/ प्रकल्प/ गृहपाठ - २० गुण |
| **14** | **Format of Question Paper:** for the final examination<br><br>**बहिर्गत परीक्षा ३० गुण** (वेळ एक तास)<br>• एकूण तीन प्रश्न विचारावेत.<br>• प्रत्येक घटकावर अंतर्गत पर्याय असलेले प्रत्येकी १० गुणांचे दोन प्रश्न विचारावेत.<br>• तिसरा प्रश्न हा घटक १ आणि २ वर आधारित १० गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरुपाचा विचारावा. | |

Sign of the BOS Chairman

Name of the Chairman: **Prof. Satish Kamat**

Name of the BOS: **Marathi**

Sign of the Offg. Associate Dean

Name of the Associate Dean: **Prin. Dr. Suchitra Naik**

Name of the Faculty: **Humanities**

Sign of the Offg. Dean

Name of the Offg. Dean: **Prin. Dr. Anil Singh**

Name of the Faculty**:** **Humanities**